# पहिले पान

संपादक : डॉ. रेखा जगनाळे



दि. ०१ ऑगस्ट ते दि. ३१ ऑगस्ट २०१८




सौ. अनिषा दुरगकर
टंकलेखन

**सुविचार :–**

***योग्य निर्णय घ्यायचे तर हवा अनुभव, जो मिळतो चुकीचे निर्णय घेऊनच।***

**Institution has developed its vision and mission.**
**The vision of the Institution is “Determined for excellence in Social Work Education”.**
**The Mission of the Institution is**
**We at BPNISW shall work continuously to achieve-**

1. **To impart quality social work education 2 To introduce newer areas of academic pursuit with grater employability potential**
3. **To introduce core values of higher education with a view to bring about holistic development to personality**
4. **Providing Social Work Education for both personal and social transformation**
5. **Providing means for the up-gradation of skills in order to increase the employability of the college students.**

**Core values:**

- **An unwavering faith in Human dignity An abiding faith in duty towards other individuals and society**

**The vision and mission of the institution is communicated to the students, teachers, staff and other stakeholders through its publication in the prospectus, institutional website, advertisement in newspapers, Orientation programme and through Alumni Association of the institute. The vision and mission of the institution is in tune with the National Education Policy, 1986. The nature of social work is such that there occurs holistic development of personality of the students. The social work syllabus is reviewed and updated periodically. In addition to this, the institution offers value added courses, innovative courses, and modular courses for the total development of personality. These courses definitely enhance the employability of the students. bridge courses; value added courses, innovative courses, and modular courses for the total development of personality. These courses definitely enhance the employability of the students.**



**स्वातंत्र्यदिन संपन्न :–**

नागरिक शिक्षण मंडळ संचालित संस्थेचा 15 ऑगस्ट 2018 ला स्वातंत्र्यदिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर ना.शि.मं. चे सर्व सम्मानिय पदाधिकारी, सर्व प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी संस्थेच्या क्रिडांगणावर उपस्थीत होते.

डॉ. तायवाडे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले याप्रसंगी विद्यार्थ्यांना आजची देशाची परिस्थीती व युवकांचे देशाप्रतिचे कर्तव्य याची आठवण करून दिली व चहा पाणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**डॉ. जगनाळे लिखित ‘नाट्यावलोकन’ ग्रंथालयास भेटः–**

विजय प्रकाशनाने प्रकाशित **‘नाट्यावलोकन’** हा ग्रंथ प्राध्यापक डॉ. रेखा जगनाळे लिखित ग्रंथाचे ऑगस्ट महिन्यात प्रकाशन झाले. हे पुस्तक ईश्वर देशमुख मेमोरियल ग्रंथालयातील ग्रंथपाल डॉ. पौर्णिमा गंथडे यांना सस्नेह भेट दिले.



‘नाटयावलोकन हा ग्रंथ महाविद्यालयातील ग्रंथालयात विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकेल.

## डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती संपन्न..



श्री. भैय्याजी पांढरीपांडे नॅशनल इंस्टिटठ्यूट ऑफ सोशल वर्क, हनुमान नगर, नागपूर येथे **डॉ. एस. आर . रंगनाथन** यांच्या **जयंतीच्या** निमित्ताने **डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती** साजरी करण्यात आली. **कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेकचे प्रभारी ग्रंथपाल डॉ. दिपक कापडे** हे **प्रमुख पाहुणे व वक्ते** होते. त्यांनी **डॉ. रंगनाथन** यांचा **सखोल** परिचय करून दिला व महाविद्यालयात ग्रंथालयाचे महत्व याविषयावर त्यांनी प्रकाश टाकला तसेच विद्यार्थ्यांना **'वाचाल तर वाचाल'** हा संदेश दिला. या प्रसंगी **अध्यक्ष** स्थानी **डॉ. अनंत बरडे** उपस्थित होते.

डॉ. पौर्णिमा गंथडे यांनी संचालन व प्रस्ताविक सादर केले. आभार प्रदर्शन श्री. कमलाकर ढबाले यांनी केले. महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. नंदा पांगुळ, डॉ. विलास घोडे, डॉ. सिमा लोबो, डॉ. रेखा जगनाळे, सौ. अनिषा दुरगकर, सौ. शर्मिला पांगुळ, श्री. रमेश लहुलकर, श्री. रूपेश ढाले, श्री. कमलाकर ढबाले, श्री. सत्यवान रामटेके, कु. शुभांगी टुले आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

## कागदी पिशव्या शिकविण्याचा महाविद्यालयाच्या उपक्रम:—

महाविद्यालयाने घेतलेल्या दत्तक बोरगांव कलांद्री या गावातील 8वी., 9वी व 10 इयतेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. रेखा जगनाळे यांनी कागदी पिशवी बनविण्याचे प्रशिक्षण दिले. यावेळी महाविद्यालयातील



गटकार्यच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना कागदी पिशव्या बनविण्याकरिता मदद केली व त्यांच्या कडून पिशव्या बनवून घेतल्या

शाळेतील विद्यार्थीनींना या प्रशिक्षणामुळे रोज़गाराची संधि उपलब्ध झाली. त्यातील काही मुलांनी पिशव्या बनवून आर्थिक सुबत्ता मिळविण्याचे प्रयत्न सुरू केले. या प्रशिक्षणा वेळी महाविद्यालयातील गटकार्याचे विद्यार्थी उपस्थित होते.

## बोरगावात वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग :—

बोरगाव कलांद्री गावातील ग्राम पंचायती जवळ सन्मानित गांवकरी व सरपंच, शाळेतील शिक्षक यांच्या मददतीने महाविद्यालयातील गटकार्याच्या विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवड केली. शाळकरी मुले, गावकरी व शिक्षकांच्या वृक्षारोपण कार्यक्रमामुळे गावातील लहान, ही लावलेली झाडे या गावातील लोकांनाच या कार्यक्रमात महाविद्यालयातील मिरे, अंजली दोनतूल, अंकिता सरोदे आणि सहकार्य भावनेतून उपक्रमाद्वारे सिद्ध केले. उपस्थित होत्या.



एकुण 25 झाडे लावली गेली . या वेळी गावातील सरपंच, उपस्थिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या गावकरी मुलांचा उत्साह पाहून शिक्षकांनी मुलांना जगवायची आहे असे सांगितले. नंदकिशोर घाडसे, सुमित लहाने, योगेश बोभाटे, रंजना दिक्षा रोकडे या विद्यार्थ्यांनी समाजकार्य प्रशिक्षणाचे धडे या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. रेखा जगनाळे

## Rotract Club पदग्रहण सोहळा :—

महाविद्यालयात रोटरॅक्ट क्लब चा महाविद्यालयात पदग्रहण सोहळा दि. 11/08/2018 रोजी पार पडला. या कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी रोटरी क्लब नागपूर, डाऊनटाऊनचा अध्यक्षा श्रीमती मिनल डेहाडराय होत्या. यप्रसंगी अतिथि म्हणून रोटरी क्लब नागपूर, डाऊन टाऊनचे पुर्वाध्यक्ष श्री. नरेंद्र जोग, न्यु जनरेशनचे जिल्हाध्यक्ष श्री. मनिष शहा, रोटरी क्लबचे प्रशासक श्री. मंदार जोशी व रोटेरीयन श्री. पराग पांढरीपांडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

अतिथिंचा हस्ते वृक्षारोपण करून दीप प्रज्वलनाने व प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. श्रीमती मिनल डेहाडराय यांनी रोटरॅक्ट क्लब तर्फे आयोजित कार्यक्रमांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. मंदार जोशी यांनी रोटरॅक्ट क्लबच्या कार्यपद्धतीविषयीची माहिती दिली. या सत्रातील सर्व पदाधिकाऱ्यांचे पदग्रहण करण्यात आले. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष विवेक सहारे यांनी क्लब तर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाबददल माहिती दिली.



निर्माल्य संकल्न, डस्टबिन प्रकल्प सेंद्रिय खत विक्री व निर्मिती, वाहतूक नियंत्रण, पर्यावरण संरक्षण इत्यादी कार्यक्रमांबाबत माहिती दिली. भूतपूर्व उपाध्यक्ष श्री. नंदकिशोर धाडसे यांनी अहवाल वाचन केला. श्री. सोमेश भटवलकर यांनी कार्यक्रमाचे संचालन केले आणि आभार कु. साक्षी लाचरवार यांनी केले.

## 'गच्चीवरिल मातीविरहीत बाग' कार्यशाळा :—




महाविद्यालयात दि. 25/08/2018 रोजी **'गच्चीवरिल मातीविरहीत बाग' कार्यशाळे**चे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खत तयार करणे याविषयावर —उमेश चित्रीव, तर मातीविरहीत कुंडी भरणे —डॉ. सुनिता कासटवार, रोप लावण्यासाठी प्लॅसीटिक बाटल्यांचा वापर करणे — विनय पटवर्धन, सिमेंट कुंडी तयार करणे— मोहिनी शेंबेकर या विवधि विषयावर मान्यवरांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन कु. विणा डोंगरवार आणि डॉ. सिमा लोबो यांनी केले.

या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## ग्रंथालय उपक्रमात डॉ. रेखा जगनाळे यांचे व्याख्यान :—

दि. 06/08/018 रोजी ग्रंथालय उपक्रमातील सृजनात्मक साहित्य या उपक्रमा अनुशंगाने **'आंधळी'** या शांता शेळके अनुवादित कादंबरीवर प्राध्यापक डॉ. रेखा जगनाळे यांनी व्याख्यान दिले. **आंधळी** या कादंबरी संदर्भातील **हेलन केलर** यांची यशोगाथा म्हणजे अशक्याला कसे शक्य करून दाखवता येते याचे उत्तम आदर्श होय. या विवेचनाद्वारे डॉ. रेखा जगनाळे यांनी विद्यार्थ्यांना 'आंधळी' या आत्मचरित्रात्मक पुस्तकाला वाचनीय स्वरूप दिले व विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोणातून वाचनाचे महत्व या स्वरूपाद्वारे उलगडून दिले व विद्यार्थ्यांना ही पुस्तक वाचण्याकरिता प्रेरित केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थीती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथपाल डॉ. पौर्णिमा गंथडे यांनी केले.







## दिनचर्या आणि आरोग्य या विषयावर व्याख्यान :–

दि. 01/08/018 रोजी ईश्वर देशमुख ज्ञानपीठातर्फे लोकमान्य टिळक आणि अन्नाभाऊ साठे जयंती निमित्ताने दिनचर्या आणि आरोग्य या विषयावर डॉ. बी.टी.वाघ यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला ज्ञानपीठ समन्वयक डॉ. पौर्णिमा गंथडे यांनी ज्ञानपीठ स्थापन करण्यामागील उददेश स्पष्ट करून सांगतांना सांगितले की, ज्ञानपीठामार्फत महाविद्यालय व समाज यांना जोडण्याचे कार्य केले जात आहे.

प्रमुख वक्ते डॉ. बी.टी.वाघ यांनी 'दिनचर्या' आणि आरोग्य' या विषयावर त्यांनी दिनचर्ये सोबत आहार, विहार आणि व्यायाम हे महत्वाचे आहे म्हणून सांगितले. व्यायामात त्यांनी पायी चालणे, प्राणायाम, योगा, सूर्यनमस्कार इ.अनेक प्रकार सांगितले. मोबाईल, टिव्ही, वापर गरजेपुरताच करा आणि आपल्या आहारात 6 प्रकारचा रसांचा समावेश करा जेणेकरून तुमचा स्वास्थ्य निरोगी राहिल असे ही त्यांनी सांगितले.

जीवन जगणे ही एक कला आहे ती आत्मसात करा. वय वाढण्याला महत्व नाही तर तुम्हाला जीवन कसं जगतं येईल याला महत्व आहे. त्यामुळे आपली दिनचर्या नियमित ठेवून आपले आरोग्य सुदृढ ठेवा आणि दीर्घआयुषी जगा असे त्यांनी सांगितले.

शेवटी ज्ञानपीठ समन्वय डॉ. पौर्णिमा गंथडे यांनी सर्वांचे आभार मानले. व्याख्यानास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस. तुळणकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## स्वागत दिन समारोह :– (welcome day celebration)

महाविद्यालयात एम.एस.डब्ल्यू भाग–1 व बी.एस.डब्ल्यू भाग–1 च्या विद्यार्थ्यांचे दि. 29/08/2018 रोजी स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी महाविद्यालया विषयी व शिक्षक व शिक्षकेतर विषयी मनोगत व्यक्त केले. कु. साक्षी लाचरवार, सोमेश भटवलकर, अनुराग ढोलेकर, राजेश निंबुळकर, प्रियंका वानखेडे, भाग्यश्री भोंबले, विवेक शहारे, आशिष गायकवाड या विद्यार्थ्यांनी मनोगतातून महाविद्यालयातील शिक्षक व प्रशासन या विषयी कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर व प्रमुख अतिथि म्हणून डॉ. दिलीप बारहाते आणि डॉ. अनंत बरडे




उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. तुळणकर यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या औचित्याचे व महाविद्यालयात येणाऱ्या नॅक कमेटी विषयी माहिती दिली व नवयाने प्रवेश एम.एस. डब्ल्यू भाग–1 व बी.एस.डब्ल्यू भाग–1घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले व त्यांना भविष्य कालीन वाटचाली करिता शभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नंदकिशोर धाडसे आणि आभार प्रदर्शन प्रियंका वानखेडे हिने केले. प्रस्तुत कार्यक्रमाला सर्व महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## गुरू पौर्णिमा कार्यक्रम



दि. २८/०७/२०१८ शनिवार ला हनुमान नगरमधील भैय्याजी पांढरीपांडे येथे स्थापीत वं. रा. तुकडोजी महाराज विचार प्रसार केंद्रामार्फत गुरूपौर्णिमेनिमित्त ' व्यक्ती विकासात गुरूचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. गुलाबरावजी खवसे ,सचिव, ग्रामगीता जीवन विकास परीक्षा, गुरूकुंज मोझरी,यांनी गुरू–शिष्य आणि गुरूकृपा यावंर भाष्य केले. गुरू–शिष्य दोघांनीही आपले कर्तव्य बरोबर पार पाडले तर आदर्श समाजनिर्मीती होईल. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ओव्यांचा आधार घेत त्यांनी गुरू–शिष्य नाते विशद केले.

वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार प्रसार केंद्रातर्फे चालविण्यात येणाऱ्या व्याख्यानमाले अंतर्गत मा. श्री. दशरथजी कोठे यांनी वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या अनेक ओव्यांचे दाखले देत मानवी आयुष्यात गुरूचे स्थान कीती महत्त्वाचे आहे ते सांगितले. विशेष अतिथी मा. डॉ. प्रदीप मोकदम यांनी समाजातील अनेक उदाहरणाद्वारे गुरूचे मार्गदर्शन शिष्याला जीवनात कसे उपयोगी ठरते हे स्पष्ट करून सांगितले.



कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोमेश भाटवलकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. नंदा पांगुळ यांनी केले. याप्रसंगी अखिल भारतीय गुरूदेव सेवा मंडळद्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या ' जीवन विकास परीक्षेचे प्रमाणपत्र ' वितरीत करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाती विद्यार्थी तसेच डॉ. दिलीप बारहाते, डॉ. अनंत बरडे, डॉ. विलास घोडे, डॉ. रेखा जगनाळे, डॉ. पौर्णिमा गंथडे, शर्मिला दरणे यांची विशेष उपस्थिती होती.



## 'मला वाचनाने काय दिले' – डॉ. निलप्रभा लक्कावार

महाविद्यालयात दि. 28 ऑगस्ट 2018 रोजी डॉ. निलप्रभा लक्कावार यांचे ईश्वर देशमुख ज्ञानपीठा तर्फे **'मला वाचनाने काय दिले'** या विषयावर व्याख्यानमालेतील प्रथम पुष्प गुंफण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. लक्कावार यांनी विद्यार्थ्यांना उद्बोधित करताना वाचन माण्साला समृद्ध करतो त्यामुळे चांगल्या विषयाचे वाचन मनुष्याने आजीवन करित रहावे असे मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार प्रदर्शन ग्रंथपाल डॉ. पौर्णिमा गंथडे यांनी केले.

## रा.से.यो. तर्फे महाविद्यालयात एच.आय. व्ही संबंधी जनजागृति कार्यक्रम :–



दि. 21 ऑगस्ट 2018 रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून रा.से.यो.च्या वतीने एच.आय. व्ही/एड्स संबंधी युवकांमधे जनजागृति व्हावी या दृष्टिने या कार्यक्रमाला वक्ते म्हणून जाधव मॅडम व तिडके मॅडम लाभल्या होत्या.

या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा भरधोस प्रतिसाद मिळाला.

## व्यसन निर्मुलन चळवळ मार्गदर्शन :–

दि. 27/08/2018 रोजी महाविद्यालयात **मनिषा बुचे** यांनी आपुल्या व्याख्यानातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची व्यसन निर्मुलन चळवळ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन विचार प्रसार केंद्रातर्फे डॉ. नंदा पांगुळ यांनी केले.



## महाविद्यालयाच्या दत्तक (बोरगांव) गाावात विविध कार्यक्रम :–

महाविद्यालयातील क्षेत्र कार्याचे विद्यार्थी व डॉ. नंदा पांगुळ यांची **दत्तक (बोरगांव)** या गावामध्ये 'महिला सक्षमीरण: आमचे हक्क' या विषयावर पी.पी.टी.द्वारे मार्गदर्शन केले तसेच 'कळी उमळताना' हा कार्यक्रम इंदिरा गांधी विद्यालय (बोरगांव) येथे किशोरवयीन मुलींसाठी अशया विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमा निमित्त किशोरवयीन मुलींमध्ये जनजागृति निर्माण करणे व आपले हक्क काय व कश्या प्रकारे घेता येईल याची सुद्दा जनजागृति करण्यात आली. या कार्यक्रमाला गावातील रहिवासी तसेच शाळेचे विद्यार्थ्यांच्या भरधोस प्रतिसाद मिळाला.



## क्लासरूम सेमिनार :–

दि. 18/08/2018 ला **ग्रामीण शाश्वत विकास : शासनाची भूमिका** या विषयावर क्लासरूम सेमिनार डॉ. नंदा पांगुळ यांनी आयोजित केला. या सेमिनार आयोजनात एम.एस.डब्ल्यू द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी भाग घेवून सेमिनार यशस्वी केला.





## मानववंशीय सुग्रहालयास विद्यार्थ्यांची भेंट :–

दि. 24/08/2018 ला एम.एस.डब्ल्यू द्वितीय वर्षाच्या ( आर.टी.सू.सी.डी.) विद्यार्थ्यांनी सेमिनरीहिल्स येथील मानववंशीय संग्रहालयास भेट दिली. या निरीक्षण भेटीचे आयोजन डॉ. सिमा लोगो यांनी केले.



## महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा रक्षाबंधन :–

दि. 26/08/2018 रोजी रक्षाबंधन निमित्ताने महाविद्यालयातील मुलींनी मुलांना रक्षेचे सूत्र बांधले व रक्षाबंधन हा दिवस संस्कृति जपणूक म्हणून इतिहास जमा करता येईल. यामुळे प्रत्येकच मुलींना व मुलांना स्वत:बरोबरच महाविद्यालयातील आपल्या बंधु भगिनी या शब्दाची आठवण देता येते. हीचतर आपली मराठमोळी संस्कृती आहे. याचे उदाहरण म्हणजे महाविद्यानलयातील रक्षाबंधन कार्यक्रम होय.